# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

भारतीय स्वातंत्र्याच्या 74 व्या वर्धापन दिनानिमित्त रविवार दि. 15 ऑगस्ट, 2021 रोजी सकाळी ठीक 8.00 वाजता विद्यापीठाच्या आवारात मा. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांचे शुभहस्ते व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण समारंभ संपन्न होणार आहे. तरी विद्यापीठातील सर्व प्रशासकीय अधिकारी, शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व विभागातील विद्यार्थी/विद्यार्थीनींनी या समारंभास उपस्थित रहावे ही विनंती. कोरोना प्रादुर्भावाच्या परिस्थितीमुळे उपस्थितांनी कार्यक्रमाच्या वेळी इतरांपासून सुरक्षित अंतरावर थांबण्याची दक्षता घ्यावी.

संचालक
विद्यार्थी विकास

जा. क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/386
दिनांक :05/08/2021

प्रति,

1. सर्व पदव्युत्तर विभाग प्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व शिक्षक, विद्यार्थी–विद्यार्थीनी व प्रशासकीय सेवक यांना वरील समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्यावी.
2. सर्व प्रशासकीय विभाग प्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व सेवकांना समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्यावी.
3. विभागप्रमुख, संगीत विभाग यांनी विद्यार्थी विकास विभागाशी संपर्क साधावा व सदरच्या कार्यक्रमाच्या वेळी राष्ट्रगीत म्हणण्याची व्यवस्था करावी.
4. वाहन विभाग प्रमुख यांनी विभागप्रमुख, संगीत अधिविभाग यांच्या सूचनेप्रमाणे गायक कलाकार यांना वाद्ये आणणेसाठी वाहन उपलब्ध करून दयावे.
5. श्री. डी आर चौगुले व श्री. बाळू वालकोळी, जमादार यांनी या समारंभावेळी मॅट आंथरणेसाठी व काढणेसाठी दोन शिपाई या विभागाच्या शिपायाच्या मदतीस दयावेत. त्याचप्रमाणे त्यांनी स्वतः उपस्थित रहावे तसे आदेश आस्थापना विभागाने त्यांना द्यावेत.
6. विद्युत अभियंता यांनी वरील दिवशी ध्वजवंदन कार्यक्रमाच्यासाठी ध्वनिक्षेपकाची व्यवस्था करावी व रांगोळीसाठी आदल्या दिवशी लाईटची व्यवस्था करावी.
7. अभियांत्रिकी विभागाने वरील दिवशी कार्यक्रमाच्या ठिकाणी स्वच्छता ठेवण्यासाठी संबंधीत कर्मचारी यांना सूचना द्यावी. तसेच ध्वजस्तंभाची स्वच्छता व वरील कप्पीची ठाकठिकता पहावी. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाची देखभाल पहावी व उद्यान विभागाच्या मदतीने छत्रपतींच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करण्याची व्यवस्था करावी.
8. नोटीस बोर्डवर लावणेसाठी–1) मुलांचे वसतिगृह क्र. 1, 2 व 3 2) मुलींचे वसतिगृह क्र. 1, व 2 3) डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन 4) बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय
9. उद्यान विभाग प्रमुखांनी ध्वजारोहण परिसरातील बागेची ठाकठिकता व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास पुष्पहार आणून तो अर्पण करण्याची व्यवस्था करावी.
10. सुरक्षा अधिकारी यांनी परेडसाठी स्कॉड तयार करावे व ध्वजारोहण प्रसंगी ध्वज हाताळण्यासाठी सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करावी.

––000––